# श्री. लक्ष्मण महादेव बुरडे

सेवक क्र. १३७६ मु. भूतेश्वरनगर, नागपूर

एकदा माझ्या बायकोचा पाय सुजला. त्या दिवशी पाय थोडा बरा होता. पण दुसऱ्या दिवशी तिला उठणे होत नव्हते. माझ्या घरी देवीचा ठाणा होता. मी देवीचा भक्त होतो. अनेक लोक माझ्या घरी दुःख दूर व्हावे म्हणून येत असत. मी लोकांचे दुःख दूर करीत असे. माझ्या बायकोचा पाय सुजल्यावर मी देवीला विनंती केली तरीही पायाची सुज कमी झाली नाही. उलट दुखणे एकदम जास्त झाले. पायाला फोड येऊ लागले. तेव्हा मला महानत्यागी बाबा जुमदेवींचा सेवक श्रीमान मारोतराव राऊत यांची आठवण झाली. आम्ही त्यांच्याकडे गेलो. त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. ते म्हणाले, ठीक आहे पण इथे एकाच भगवंताच्या नावावर मरावे लागले. तेव्हा मी म्हणालो, बाबा रे! आता आम्ही असे मरतो आहे तर एकाच भगवंताच्या नावाने मेलेले बरे. तेव्हा श्रीमान मारोतराव राऊतजींना विनंती केल्यावर त्यांनी तीर्थ करुन दिले. त्यात पायाची सुज कमी झाली व पाय आपोआप दुरुस्त झाला. नंतर आम्ही घरी असलेला देवीचा ठाणा विसर्जित केला. त्यानंतर मारोतराव राऊत यांच्याकडून सात दिवसांची, अकरा दिवसांची, एकवीस दिवसांची व शेवटी बेचाळीस दिवसांची पक्की अगरबत्ती घेतली. बेचाळीस दिवसांच्या अगरबत्तीमध्ये आमच्या कुटुंबात परिपूर्ण समाधान मिळाले. ही सेवा आम्हाला विनामूल्य मिळाली.

मार्गावर आल्यानंतर माझ्या कुटुंबात घडलेली घटना. माझा मुलगा सीताराम बुरडे यांच्या बाबतीत प्रत्यक्ष घडलेली एक घटना त्यांच्या शब्दात सादर करीत आहे.

मी सीताराम बुरडे दि. १४-६-८४ ला सकाळी नऊ वाजता उनी गालीचे विणकाम केंद्रात कामावर गेलो. मला सकाळपासून तहान लागली होती. मी माझे हजेरी कार्ड डब्यात टाकले. मला तहान लागली असल्यामुळे तिथे ठेवलेल्या पाण्याच्या नांदीजवळील ग्लास घेतला, न पाहताच त्या ग्लासात पाणी ओतून ते प्यालो. पाणी पीत असताना माझ्या घशात काही तरी अडकल्यासारखे वाटले. मी नंतर खूप पाणी प्यालो. त्यामुळे ते आत गेले. नंतर मी दोन बोटे घशात घालून उलटी केली पण ते काही बाहेर आले नाही. नंतर माझे लक्ष जेथून ग्लास उचलला होता त्या ठिकाणी गेले. तिथे विजगुराची शेपटी पडलेली होती व तिला मुंग्या लागल्या होत्या. त्यामुळे माझ्या पोटात विजगुर गेल्याचा मला भास झाला. नंतर मी काम करण्यास सुरुवात केली.

दुपारचे १२ वाजेपर्यंत छान काम केले पण १२ नंतर मात्र मला चक्कर आल्यासारखे वाटू लागले. मी लूमवर पडलो व तेथेच झोपी गेलो. सायंकाळी पाच वाजता उठून मी घरी आलो. घरी आल्यानंतर थोडा भात खाल्ला व आंबे फोडण्याकरिता बसलो. ५-६ आंबे फोडून झाल्यावर आंबे फोडायची सुरी माझ्या बोटाला लागली. माझ्या बोटातून रक्त वाहू लागले. ते रक्त मला हिरवे कंच दिसू लागले. त्यामुळे मी भगवान बाबा हनुमानजींना प्रार्थना करुन सरकारी विम्याच्या दवाखान्यात गेलो. त्यांनी मला तपासले. हात कशामुळे कापला याची विचारपूस केली. सर्व सांगितले. पण डॉक्टरला विश्वास बसला नाही. ते म्हणाले खरे सांग काय झाले ते! मी त्यांना म्हटले, मला काहीच माहित नाही. मला इंजेक्शन व पट्टी लिहून द्या. पण त्यांनी माझ्या बोटातील रक्त काढून काचेवर तपासण्याकरिता ठेवले. मला इंजेक्शन व पट्टी लिहून दिली. ते घेऊन मी घरी गेलो. दुसऱ्या दिवशी विम्याच्या दवाखान्यात गेलो असता डॉक्टरांनी सांगितले. तुझ्या अंगातील रक्तात विष झाले होते. तेव्हा मी सांगितले, काल मी पानी पिताना विजगुर पोटात गेले. डॉक्टरांनी म्हटले तू वाचलास कसा हेच समजत नाही. कारण तुझ्या रक्तात पूर्णपणे विष झाले होते. तेव्हा डॉक्टरांना मी सांगितले जर मी भगवान बाबा हनुमानजीला अंगी बांधले नसते, तर माझे काय झाले असते हे परमेश्वराला माहीत. ही बाबा हनुमानजींचीच महान कृपा आहे. त्यामुळे मला काहीच झाले नाही. मी भगवंताच्या उपकारांना कधीही विसरणार नाही.

* * * * *